प्रेस नोट

पुणे
दि.०४/११/२०२६

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत ४.८७ लाख पात्र लाभार्थी शेतक-यांच्या खात्यावर रक्कम रु.४७६४ कोटी जमा करणेबाबत.

- महाराष्ट्र शासनाने दि.०२/०६/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ ही योजना सुरु केली आहे.
- या योजनेतंर्गत दि. ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२५ या कालावधीत वितरित झालेल्या व दि. ३०/०९/२०२५ पर्यत थकित असलेल्या व दि. ३१/०३/२०२६ पर्यत परतफेड न झालेल्या पीक कर्ज व पुनर्गठित / फेरपुनर्गठित कर्जास रुपये दोन लाखापर्यत कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे.
- या योजनेची अंमलबजावणी ऑनलाईन संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येत असुन यासाठी शासनाने महाआयटी यांची नियुक्ती केली आहे.
- या योजनेसाठी महाआयटी यांनी तयार केलेल्या योजना पोर्टलवर बँकांनी एकुण ३१.१७ लाख थकीत कर्ज खात्यांची माहिती अपलोड केली आहे.
- महाआयटी यांनी संगणकीय संस्करण केलेल्या माहितीनुसार आतापर्यंत पहिल्या यादीमध्ये १६,९६,२०१, दुस-या यादीमध्ये ४,१९,७३७, तिस-या यादीमध्ये ३,५१,१९२ तर चौथ्या यादीमध्ये १,१५,६९७ अशी एकुण २५,८२,८२७ इतक्या पात्र लाभार्थी शेतक-यांची यादी शासनाकडून आधार प्रमाणीकरणासाठी प्रसिध्द करण्यात आली आहे.
- आतापर्यंत आधार प्रमाणीकरण झालेल्या शेतक-यांपैकी १५.८५ लाख पात्र लाभार्थ्यांना कर्जमुक्तीची रक्कम रु.१३,२७५ कोटी शेतक-यांच्या कर्जखात्यात जमा करण्यात आली आहे.
- आज रोजी आधार प्रमाणीकरण झालेल्या शेतक-यांपैकी ४.८७ लाख पात्र लाभार्थ्यांना कर्जमुक्तीची रक्कम रु.४७६५ कोटी इतकी शेतक-यांच्या खात्यात जमा करण्यात येत आहे.
- त्यानुसार आज अखेर आधार प्रमाणीकरण झालेल्या शेतक-यांपैकी २०.७२ लाख पात्र लाभार्थ्यांना कर्जमुक्तीची रक्कम रु.१८,०४० कोटी इतकी शेतक-यांच्या खात्यात जमा करण्यात आली आहे.
- पात्र शेतकरी व त्यांचे एकुण लाभाची रक्कम याबाबत विभाग व जिल्हा निहाय चौथी यादी दि.०४/११/२०२६ सोबत जोडलेली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६
विभाग व जिल्हानिहाय वाटप (चौथी यादी) दि.०४/११/२०२६

अ.क्र.	विभाग	जिल्ह्याचे नाव	शेतकरी संख्या	लाभ रक्कम (रु. कोटी मध्ये)
१	नागपूर	भंडारा	२,७३६	२०.१६
		चंद्रपूर	३,९२३	३२.८३
		गडचिरोली	२,३११	१६.२५
		गोंदिया	२,६३०	१९.५३
		नागपूर	९,८६४	१०९.१७
		वर्धा	१२,०६२	१२९.७५
		विभाग एकूण	३३,५२६	३२७.७०
२	अमरावती	अकोला	१२,३११	१२०.७८
		अमरावती	१६,३४०	१७८.५३
		बुलढाणा	४४,३७२	४८१.१७
		वाशीम	८,२७८	८४.००
		यवतमाळ	१९,७९९	२१५.८२
		विभाग एकूण	१,०१,१००	१,०८०.३०
३	छत्रपती संभाजीनगर	छत्रपती संभाजीनगर	३६,०७१	३२५.११
		बीड	५७,८७३	५८९.९३
		हिंगोली	१९,६१८	२१९.९३
		जालना	३९,९८१	३५३.५२
		लातूर	८,२९२	७८.४५
		नांदेड	५४,९१०	५५४.८४
		धाराशिव	१८,५५९	२०७.४३
		परभणी	३४,७५४	३६८.८४
		विभाग एकूण	२,७०,०५८	२,६९८.०४
४	नाशिक	अहिल्यानगर	१८,९१२	१६६.८५
		धुळे	५,०१७	५२.६१
		जळगाव	६,९७६	४५.७०
		नंदुरबार	२,१७३	२३.३८
		नाशिक	५,३७५	५५.९०
		विभाग एकूण	३८,४५३	३४४.४३

अ.क्र.	विभाग	जिल्ह्याचे नाव	शेतकरी संख्या	लाभ रक्कम (रु. कोटी मध्ये)
५	पुणे	कोल्हापूर	२,७५०	२१.०४
		पुणे	१२,८८६	७८.९४
		सांगली	८,८७८	५५.४८
		सातारा	४,८७६	३२.९८
		सोलापूर	७,२९१	८२.०९
		विभाग एकूण	३६,६८१	२७०.५३
६	कोकण	रायगड	१,५९६	१२.००
		रत्नागिरी	७८५	४.४९
		सिंधुदुर्ग	६३९	४.१०
		ठाणे	२,४२९	१४.७४
		पालघर	१,४९०	८.४४
		विभाग एकूण	६,९३९	४३.७७
		राज्य एकूण	४,८६,७५७	४,७६४.७७